महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा.सं./जनसंपर्क/वृत्तपत्र टिप्पणी/ **दिनांक :** १९.३.२०११



## वृत्तपत्र टिप्पणी
## महानिर्मितीच्या संचालक (संचलन) पदावर मा.श्री. एम.जी. वाघमोडे यांची नियुक्ती

महानिर्मितीच्या संचालक (संचलन) या पदावर मा.श्री. एम.जी. वाघमोडे यांची दि. ११ मार्च २०११ रोजी नियुक्ती करण्यात आली आहे. श्री. वाघमोडे यांनी नुकतचा या पदाचा कार्यभार स्विकारला आहे. यापूर्वी ते कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन) म्हणून प्रकाशगड, मुंबई येथील मुख्य कार्यालयात कार्यरत होते. श्री. वाघमोडे यांना वीजनिर्मितीच्या संचलन व सुव्यवस्था क्षेत्रातील ३५ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे.

सन १९७४ मध्ये मराठवाडा विद्यापीठातून बी.ई (मेकॅनिकल) ही पदवी संपादन केल्यानंतर १९७६ मध्ये तत्कालिन म.रा.वि. मंडळात ते कनिष्ठ अभियंता (नि.) या पदावर नाशिक औ.वि. केंद्रात कामावर रुजू झाले. कनिष्ठ अभियंता ते कार्यकारी अभियंता असा १४ वर्षांचा प्रदीर्घ कार्यकाल (जून १९९० पर्यंत) व नंतर बाष्पक दुरुस्ती विभागामध्ये परळी औ.वि. केंद्र येथे मे २००१ पर्यंत ११ वर्ष कामाची धुरा सांभाळली. तसेच कार्यकारी अभियंता (संचलन व सुव्यवस्था) या पदावर पोफळी जलविद्युत केंद्र येथे सुध्दा जवळजवळ ३ वर्षे (फेब्रु. २००४ पर्यंत) जबाबदारी पार पाडली. फेब्रुवारी २००४ ते सप्टेंबर २००४ असा ७ महिन्यांचा कालावधी वरिष्ठ कार्यकारी अभियंता चाचणी विभाग, पुणे येथे ते कार्यरत होते. सप्टेंबर २००४ मध्ये अधीक्षक अभियंता म्हणून पदोन्नती होऊन ते चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र येथे रुजू झाले. महाव्यवस्थापक म्हणून सप्टेंबर २००६ मध्ये नाशिक औ.वि. केंद्र येथे त्यांची बदली झाली. ऑक्टोबर २००७ मध्ये मुख्य महाव्यवस्थापक या पदावर पदोन्नती होऊन ते मुख्य कार्यालयात सांघिक पर्यावरण या विभागाचे मुख्य म्हणून रुजू झाले. २००८ मध्ये पुन्हा ते नाशिक औ.वि. केंद्राचे मुख्य महाव्यवस्थापक म्हणून कार्यरत होते. तसेच २००८ मध्ये त्यांनी मुख्य महाव्यवस्थापक (प्रोजेक्ट मॉनिटरींग ग्रुप) म्हणून देखील कामकाज बघितले होते.